महाराष्ट्र एनसीसीला राज्यपालांचे प्रशस्तीपत्र प्रदान

मुंबई : एनसीसीमध्ये विद्यार्थ्यांवर देशभक्ती, शिस्त व समाजसेवेचे संस्कार घडतात. सर्वांकरीता एनसीसी प्रशिक्षण अनिवार्य झाले तर ती खरोखरच चांगली गोष्ट होईल. एनसीसी प्रशिक्षणामुळे समाजाप्रती जबाबदार नागरिक घडतात, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी गुरुवारी येथे केले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) महाराष्ट्र संचालनालयाला सर्वोत्कृष्ट संचालनालय ठरल्याबद्दल राज्यपाल बैस यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ३०) राजभवन येथे 'राज्यपालांचे प्रशस्तीपत्र' समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले, त्यावेळी तो बोलत होते. राजभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या 'प्रशस्तीपत्र प्रदान सोहळ्यात' राज्यपालांच्या हस्ते महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगेंद्र सिंह यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. आपण स्वतः एनसीसी कॅडेट होतो असे नमूद करून देशातील शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिस्तीचे महत्व जाणवले, तर देश अतिशय वेगाने प्रगती करेल, असे राज्यपालांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाने आजपर्यंत २३ वेळा पंतप्रधानांचे ध्वजनिशान जिंकले.

पुणे आंदोलनप्रकरणी अंधारे-धंगेकरांना नोटीस बजावणार

तीन दिवसांत विधाने मागे घेण्याचा इशारा

प्रतिनिधी
■ मुंबई

पुण्यात ललित पाटील प्रकरणी ठाकर गटाच्या नेत्या सुषमा अंधारे आणि आमदार रवींद्र धंगेकर यांनी मंत्री शंभूराज देसाई यांच्या नावाचा उल्लेख केल्याने वातावरण चांगलेच तापले आहे. याप्रकरणी मंत्री शंभूराज देसाई यांनी अंधारे आणि धंगेकर यांना तीन दिवसांच्या आत माफी मागण्याचा इशारा दिला आहे. सुषमा अंधारे आणि रवींद्र धंगेकर केवळ स्टंटबाजी करत आहेत. त्यांनी माफी न मागितल्यास न्यायालयीन कारवाई केली जाईल असेही देसाई म्हणालेत.

आंदोलन करताना खोक्यावर माझा फोटो

आमदार रवींद्र धंगेकर आणि सुषमा अंधारे यांनी उत्पादक शुल्क कार्यालयात अधिकाऱ्यांना भ्रष्टाचारी हफ्त्याची यादीच वाचून दाखवली होती. तसेच, संबंधितांवर कारवाई करण्याची मागणीही केली होती. यावेळी सुषमा अंधारे यांनी मंत्री शंभूराज देसाई यांच्या नावाचा उल्लेख देखील केला होता. याबाबत शंभूराज देसाई आक्रमक झाले आहेत. ते म्हणाले, "विधानसभा सदस्य रविंद्र धंगेकर व सुषमा अंधारे यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागात शासकिय कार्यालयात जाऊन जाब विचारला. पुण्यात घडलेल्या घटनेनंतर पोलिस उत्पादन शुल्क विभागाने कारवाई केली. मात्र, आंदोलन करताना खोक्यावर व हातात पैसे घेऊन आंदोलन केले. माझा फोटो त्यावर होता, मला ते व्हिडिओ आले", असे देसाई यांनी सांगितले.

मुंबईतील 63 तासांच्या मेगाब्लॉकला नागरिकांचा विरोध

शिवसेनेची मुख्यमंत्री शिंदेंकडे सुट्टीची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

ठाणे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म रुंदीकरणाच्या कामांसाठी मध्य रेल्वेने मुंबईत ३ दिवसांच्या मेगाब्लॉकची घोषणा केली आहे. यामुळे उपनगरीय मार्गावरील ९३० फेऱ्या रद्द होऊन सुमारे ३३ लाख प्रवाशांचे हाल होणार आहेत. यावरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवर जोरदार घोषणाबाजी केली.

दुसरीकडे, रेल्वेच्या ब्लॉकमुळे शासकीय किंवा निमशासकीय कार्यालये व खासगी कंपन्यातील नोकरदार वर्गाला 'सुट्टी' किंवा 'वर्क फ्रॉम होम' जाहीर करावा, अशी मागणी शिवसेना प्रवक्त्या ॲड. सुशीबेन शाह यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे मागणी केली आहे. मध्य रेल्वेने ठाणे स्थानकातील प्लॅटफॉर्मच्या रुंदीकरणासाठी ३० मे रोजी मध्यरात्रीपासून २ जूनपर्यंत ३६ तासांचा विशेष ब्लॉक जाहीर केला आहे. तसेच सीएसएमटी रेल्वे स्थानकातील प्लॅटफॉर्म विस्तारीकरणासाठी ३० मे रोजी मध्यरात्रीपासून २ जून दुपारपर्यंत ३६ तासांचा ब्लॉक घेण्यात येणार आहे. या ब्लॉकमुळे मध्य रेल्वेच्या उपनगरीय मार्गावरील ९३० लोकल फेऱ्या रद्द करण्यात येणार आहेत.

मध्य रेल्वेचा मुंबई विभाग खूप संवेदनशील असून, येथे कोणतीही घटना घडल्यास, त्याचे पडसाद सर्वदूर पडतात. शुक्रवारी रात्रीपासून सीएसएमटी येथे ब्लॉक आहे. त्यामुळे ९३० लोकल फेऱ्या रद्द झाल्या आहेत. परिणामी, लाखो प्रवाशांचे हाल होणार आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. मध्य रेल्वेच्या जनसंपर्क विभागाने याची माहिती अगोदर देणे गरजेची होती. परंतु, जनसंपर्क विभागाच्या सावळा गोंधळामुळे नागरिकांना प्रवासादरम्यान नाहक त्रास सहन करावा लागणार आहे. तसेच, मोठ्या प्रमाणात प्रवासी घराबाहेर पडले तर गर्दीचे नियोजन रेल्वे प्रशासनाने कसे करणार? प्रवासादरम्यान चेंगराचेंगरी झाल्यास ह्याची जबाबदारी कोण घेणार? असे अनेक प्रश्न शिवसेना प्रवक्त्या ॲड. सुशीबेन शाह यांनी उपस्थित केले आहे.

मध्य रेल्वेच्या मनमानी कारभारविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे आंदोलन

प्लॅटफॉर्मच्या रुंदीकरणाच्या कामांसाठी मध्य रेल्वेने तीन दिवसांचा मेगाब्लॉक जाहीर केला आहे. यामुळे उपनगरीय मार्गावरील ९३० फेरी रद्द होणार असल्याने ३३ लाख प्रवाशांचे हाल होणार आहेत. मध्य रेल्वेच्या मनमानी कारभारविरोधात आणि ब्लॉक मागे घ्यावा, या मागणीसाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसने आज छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे जोरदार घोषणाबाजी करत तीव्र आंदोलन केले. मध्य रेल्वेच्या मनमानी कारभारविरोधात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मुंबई अध्यक्ष ऐड.अमोल मातेले यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे घोषणाबाजी करत जोरदार आंदोलन करत मेगाब्लॉक मागे घेण्याची मागणी केली.मेगाब्लॉक घेण्यापूर्वी किमान सात दिवस अगोदर रेल्वे प्रवाशांना सूचना देण्यात यावी, बेस्ट, एसटी बसची पर्याय व्यवस्था करावी, मासिक पासधारक आणि मेल गाड्यांचे पूर्व बुकिंग असलेल्या प्रवाशांसाठी मोफत व्यवस्था करावी, अशा विविध मागण्या युवक काँग्रेसने मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राम करण यादव यांच्याकडे केल्या.

नागरिकांच्या सुरक्षिततेखातर वृक्ष छाटणीसाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर - ॲड. सुशीबेन शाह

प्रतिनिधी
■ मुंबई

शहरातील पावसाळ्याची पूर्वतयारी लक्षात घेता, पालकमंत्री दीपक केसरकर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पावसाळ्यापूर्वी वृक्ष छाटणी मोहिमेदरम्यान कंत्राटदारांसह तज्ज्ञांची नियुक्ती करण्याच्या सुचना दिल्या आहेत. केसरकर यांनी बनविभागाशीही चर्चा करून वृक्षतोड आवश्यक असल्यास करा, असेही यावेळी सांगितले.

जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून शहरात दाखल होणार आहे. वृक्षतोड प्रक्रियेची माहिती नसतानाही ठेकेदारांकडून विनाकारण वृक्षतोड होत असल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या होत्या. राज्यसभा खासदार मिलिंद देवरा यांच्याकडे रहिवाशांनी तक्रार केल्यानंतर केसरकर यांनी रहिवाशांशी चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात आला. दक्षिण मुंबईतील वृक्षतोडीमुळे संतप्त झालेल्या मलबार हिल, कुलाबा आणि इतर भागातील रहिवाशांच्या शिष्टमंडळाने पालकमंत्री दीपक केसरकर, खासदार मिलिंद देवरा व शिवसेना प्रवक्त्या ॲड. सुशीबेन शाह यांनी महानगरपालिकेच्या कंत्राटदारांकडून झाडांची छाटणी करण्याऐवजी ती तोडली जात असल्याची तक्रार केली. यावेळी केसरकर यांनी त्यांच्या शासकीय निवासस्थानी रहिवाशांची बैठक घेऊन संयमाने त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि पुढील सुचना दिल्या.

पावसाळा सुरू झाल्यावर झाडे पडण्याच्या दुर्घटना टाळण्यासाठी आणि झाडांची वर्गवारी करून त्यांची छाटणी करावी लागेल की नाही, हे तपासण्यासाठी आम्ही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून वृक्ष संगोपन तज्ज्ञांची नियुक्ती करण्याच्या सुचना दिल्या आहेत. वृक्ष छाटणी मोहीम सुरू करण्यात येणार असून रहिवासी देखील वृक्ष छाटणी संदर्भात उपाययोजना सुचवू शकतात. तसेच वृक्षतोडीची प्रक्रिया शास्त्रोक्त पद्धतीने केली जाईल, असे आश्वासन दीपक केसरकर यांनी दिले.

वृक्ष का पडतात याचा अभ्यास करा!

प्रशासनाकडून झाडांची छाटणी न करता त्यांची कत्तल केली जाते. याला नागरिकांचा मोठा विरोध आहे. आता प्रशासनाने तज्ज्ञांची समिती नेमली आहे. ही चांगली बाब आहे. परंतु, आता पहावे लागले की ही समिती कशाप्रकारे काम करते. सध्या मुंबईमध्ये परिस्थिती बिकट असून झाडांची कशीही छाटणी केली जाते, तर हे प्रकार कुठेतरी थांबले पाहिजे. वृक्ष का पडतात, या मुळ मुद्याकडे लक्ष दिले जात नाही.

- डी. स्टॅलिन, पर्यावरणप्रेमी.

कुलाबा ते दादर दरम्यान पाणीबाणी

३ आणि ४ जूनला पाणीपुरवठा बंद

प्रतिनिधी
■ मुंबई

रुकी येथील भारतीय तंत्रज्ञान संस्थेच्या प्राध्यापकांमार्फत ३ आणि ४ जून २०२४ रोजी मलबार हिल जलाशयाची अंतर्गत पाहणी करण्यात येणार आहे. त्यासाठी जलाशयाच्या क्रमांक १ आणि २ टप्प्या-टप्प्याने रिक्त करणयात येणार आहे. तृयामुळे ३ आणि ४ जून या कालावधीत कुलाबा/ए, चंदनवाडी/सी, ग्रँट रोड/डी, वरळी/जी दक्षिण आणि दादर/जी उत्तर विभागातील काही भागांतील पाणीपुरवठ्यात कपात केली जाणार आहे.

या कालावधीत ए, सी, डी, जी दक्षिण आणि जी उत्तर विभागातील काही भागांच्या पाणीपुरवठ्यात कपात केली जाणार आहे.

डी विभाग–(सोमवार, दिनांक ०३.०६.२०२४ रोजी सकाळी ८.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत) पेडर रोड (नियमित पाणीपुरवठ्याची वेळ दुपारी ०१.०० ते रात्री १०.३०) (पाणीपुरवठ्यात २० टक्के कपात)

मलबार हिल व आझाद मैदान जलाशयातून पाणीपुरवठा होणारे 'डी' विभागातील सर्व क्षेत्र (उपरोक्त विभाग वगळून) (पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात) जी उत्तर व जी दक्षिण विभाग – (सोमवार, दिनांक ०३.०६.२०२४ रोजी सकाळी ८.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत) जी उत्तर व जी दक्षिण विभागातील बेट पाणीपुरवठा होणारे सर्व विभाग (पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात)

ए विभाग – (मंगळवार, दिनांक ०४.०६.२०२४ रोजी सकाळी ८.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत) मलबार हिल व आझाद मैदान जलाशयातून पाणीपुरवठा होणारे 'ए' विभागातील सर्व क्षेत्र (पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात)

सी विभाग–(मंगळवार, दिनांक ०४.०६.२०२४ रोजी सकाळी ८.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत) मलबार हिल व आझाद मैदान जलाशयातून पाणीपुरवठा होणारे 'सी' विभागातील सर्व क्षेत्र (पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात)डी विभाग – (मंगळवार, दिनांक ०४.०६.२०२४ रोजी सकाळी ८.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत) मलबार हिल व आझाद मैदान जलाशयातून पाणीपुरवठा होणारे 'डी' विभागातील सर्व क्षेत्र (पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात)

जी उत्तर व जी दक्षिण विभाग –(मंगळवार, दिनांक ०४.०६.२०२४ रोजी सकाळी ८.०० ते सकाळी १०.०० वाजेपर्यंत) जी उत्तर व जी दक्षिण विभागातील बेट पाणीपुरवठा होणारे सर्व विभाग (पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात)

थकबाकी वसुलीची रक्कम कंपनीला न देता स्वत:च्याच खिशात, एजन्सी चालकावर गुन्हा

मुंबई : वाहन कर्ज देणाऱ्या कंपनीने कर्जाच्या हप्ते थकवणाऱ्या ग्राहकांकडून वसुलीचे काम एका एजन्सीला दिले होते. या एजन्सीने जवळपास १३ लाखांची रक्कम कर्जदारांकडून वसूलही केली. मात्र त्यांनी ही रक्कम कंपनीच्या खात्यावर भरली नाही. इतकेच नाही, तर कर्जदारांकडून जप्त केलेली वाहनेदेखील कंपनीला न देता परस्पर विकली. या प्रकरणी कांदिवली पोलिस ठाण्यात एजन्सीच्या चालकावर गुन्हा दाखल केला आहे. एल अँड टी फायनान्स होल्डिंग या कंपनीच्या वतीने वाहन कर्ज दिले जाते. कर्जाचे हप्ते थकवणाऱ्या ग्राहकांकडून पैसे वसूल करण्याचे काम कंपनीच्या वतीने वेगवेगळ्या एजन्सीकडे दिले जाते. मालाड पश्चिमेकडील एस. टी. एफ एजन्सीला वसुलीचे काम देण्यात आले होते. या एजन्सीने सुमारे १८ कर्जदारांकडून सुमारे १२ लाखांपेक्षा अधिक रक्कम वसूल केली. मात्र कर्जा परतावाचाही कोणतीच पावती कर्जदारांना देण्यात आली नाही. त्यामुळे त्यांनी कंपनीशी संपर्क साधला. याबाबत कंपनीच्या वतीने शहानिशा केली असता, एजन्सीने ही रक्कम कंपनीच्या खात्यामध्ये जमा केली नसल्याचे निदर्शनास आले. कंपनीच्या वतीने कर्जदारांकडे चौकशी केली असता, त्यांच्याकडून वाहनेही जप्त करण्यात आल्याचे सांगण्यात आले. एजन्सीच्या मालकाने ही वाहने कंपनीकडे जमा न करता परस्पर विक्रीसाठी ठेवल्याचे समोर आले.

मध्य रेल्वेवर मेगाब्लॉक निमित्त बेस्ट व एसटीच्या अतिरिक्त बसगाड्या

प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते ठाणे दरम्यानच्या स्थानकांच्या प्लॅटफॉर्म चे रुंदीकरण आणि विस्तारीकरण करण्यात येत आहे. गाकरीता मध्येरेल्वे दि. ३१ मे २०२४ ते दि. १ जून २०२४ असा तीन दिवसांचा मेगाब्लॉक जाहीर कलेला आहे. याचा लोकल सेवेवर परिणाम होणार आहे. मुंबईच्यारेल्वे मधून प्रवास करणा-या प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून बेस्ट उपक्रमातर्फ शुकवार ३१.०५.२०२४ तसेच शनिवार दि. १ जून २०२४ रात्री ००.३० वाजल्या पासून रविवार दि. २ जून २०२४, दुपारी १२.३० वाजेपर्यंत अतिरिक्त बसगाड्या चालविण्यात येणार आहेत.

बेस्ट ने १जुन रोजी रात्री १२.३० वाजे पासून ते २ जुन रोजी दुपारी १२.३० पर्यंत १२ बसेसच्या २३२ फेऱ्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते दादर, कुलाबा आगार ते भायखळा, कुलाबा आगार ते वडाळा प., छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते घारावी आगार, श्यामा प्रसाद मुखर्जी चौक ते प्रतीक्षा नगर, सायन, बकबे आगार ते एम एम आर डी ए वसाहत, माहुल, कुलाबा आगार ते खोदादाद सर्कल, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते भायखळा स्थानक, राणी लक्ष्मी बाई चौक ते दादलानी पार्क अशा बसेस धावणार आहेत. तसेच ३१ मे, १ जुन व २ जुन रोजी दुपारी ३.३० पर्यंत ४५ बस गाड्यांच्या २५४ फेऱ्या मारणार आहे.

काल गुरूवार मध्यरात्री साडे बारा वाजेनंतर ठाणे स्थानकात सुरू होणारा ६३ तासांचा आणि आज, शुक्रवार मध्यरात्री साडेबारानंतर सीएसएमटीत ३६ तासांचा ब्लॉक घोषित करण्यात आला आहे. ब्लॉकमुळे राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने मुंबईतील कुर्ला नेहरूनगर, परळ आणि दादर स्थानकातून ठाणेसाठी ५० जादा गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या मुंबई आगारातील २६ आणि ठाणे आगारातून २४ गाड्यांचे नियोजन करण्यात आले आहे. प्रवासी मागणी लक्षात घेता यात आवश्यकतेनुसार वाढ करण्यात येणार आहे. प्रवाशांना मार्गदर्शनासाठी ठाणे आणि मुंबई आगारात अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत, अशी माहिती एसटी महामंडळाच्या वाहतूक विभागाने दिली.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-tender notice (2nd Call)

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in for following works under EHV O&M Division, Kalwa,

Sr. No.	Tender No	Estimated Amount in Rs.	Nature of Work	Download of tender documents Date
1	EE/EHV/O&M/DN/KLW/ TENDER-29/ 2024-25 2nd Call	380674.05	Suppy of Gray Cloth, Polythene papers & Silica Gel etc for pre-monsoon maintenance work at various various substation & Lines S/Dn under EHV O&M Dn., Kalwa for the year 2024-25.- (RFx. No.7000031215)	Tender Downloading Dates & time. From Dt. 31.05.2024 To Dt:07.06.2024 up to 10:00 Hrs. Technical Opening: - Dt.07.06.2024 at 11:00 hrs (Onwards if possible) Commercial Opening:- Dt.07.06.2024 at 14:00 hrs (Onwards if possible)

Tender fee:- Rs. 500+GST

Contact Person : The Executive Engineer, Mob. No. 9930496231.

For further details visit our Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in
Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.

-Sd-
EE, EHV (O&M) Dn., Kalwa

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड
सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
२८/३०, अनंत वाडी, बिनानी भवन, ताळ मजला, भूलेश्वर, मुंबई ४००००२ ई-मेल : spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळ: www. spvglobal.in

मार्च ३१, २०२४ रोजी संपलेल्या तिमाही/ वर्षासाठी लेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षांचा आरराखडा

(क. लाखामध्ये) ईपीएस वगळता

तपशिल	एकमेव				एकत्रिकृत			
	संपलेली तिमाही	गत वर्षाभ्रील संपलेले तत्सम ३ महिने संपलेली तिमाही	संपलेले वर्ष	संपलेले गत वर्ष	संपलेली तिमाही	गत वर्षाभ्रील संपलेले तत्सम ३ महिने संपलेली तिमाही	संपलेले वर्ष	संपलेले गत वर्ष
कार्यांमधून स्कूल उत्पन्न (निव्वळ)	३१.मार्च.२४	३१.मार्च.२३	३१.मार्च.२४	३१.मार्च.२३	३१.मार्च.२४	३१.मार्च.२३	३१.मार्च.२४	३१.मार्च.२३
सामान्य कार्यांमधून कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पूर्व)	१,२६८.२१	२,०८२.१२	४,५७३.०८	२,७६६.१४	२५,४१८.०१	६४,३१८.७५	५९,१४०.५१	१,०००३.८४
कर पूर्व कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पश्चात)	१७.१७	३६.८८	६४.३६	६७.३७	१,०१४.४४	२,३९९.३१	१,२१५.३५	१,०००३.८४
कर पश्चात कालावधीसाठी निव्वळ नफा/ (तोटा) (कर, अपवादात्मक आणि/ किंवा अतिविशिष्ट बाबी पश्चात)	१२.७८	२७.२८	४८.०३	४३.७६	७०७.७१	१,९६४.७१	९६०.०७	७७१.१२
इस भाग भांडवल	१९६.००	१९६.००	१९६.००	१९६.००	१९६.००	१९६.००	१९६.००	१९६.००
(प्रती भाग रु. १०/- इतकी मूल्य असलेले)	-	-	२४७.७४	१९४.५३	-	-	१५,६७०.१६	१५,१९२.१५
प्रती भाग उत्पन्न (अपवादात्मक बाबी पूर्व) (रु. १०/- प्रत्येकीचे) (वार्षिकीकरण केलेले नाही)								
(ए) मूळ	०.६५*	१.३९*	२.४५	२.२३	१३.०८*	१००.२४*	२५.९५	३४.२४
(बी) सौम्यीकृत	०.६५*	१.३९*	२.४५	२.२३	१३.०८*	१००.२४*	२५.९५	३४.२४
प्रती भाग उत्पन्न (अपवादात्मक बाबी पूर्व) (रु. १०/- प्रत्येकीचे) (वार्षिकीकरण केलेले नाही)								
(ए) मूळ	०.६५*	१.३९*	२.४५	२.२३	१३.०८*	१००.२४*	२५.९५	३४.२४
(बी) सौम्यीकृत	०.६५*	१.३९*	२.४५	२.२३	१३.०८*	१००.२४*	२५.९५	३४.२४

टिप: *वार्षिकीकरण केलेले नाही

१. उपरोक्त निष्कर्ष सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) २०१५ च्या अनुसार प्रसिद्ध करण्यात येत आलेत आणि लेखा परीक्षण समितिने सविस्तर केले आलेत आणि संचालक मंडळाने त्यांच्या २९ मे २०२४ रोजी झालेल्या बैठकेच्या संमत केले आलेत. करणी (भारतीय लेखा मानक) नियमावली २०१६ (वेळोवेळी फेरबदल करण्यात आल्या प्रमाणे) अनुसार भारतीय लेखा मानक (इंड एएस) अनुसार तयार करण्यात आले आलेत. आणि कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत अधिसूचित करण्यात आले आलेत. कंपनीच्या सैद्यांतिक लेखा पद्धतींच्या इतर विवरणाचे समीक्षण करण्यात आले आलेत.

२. कंपनी पूर्णपणे व्यापार विभागामध्ये कार्यरत आहे आणि कंपनीचा सर्व व्यवहार झाच क्षेत्रांमधली आहे. इन्टिरट्रेड ऑफ चार्टर अकाऊंटट ऑफ इंडिया द्वारे जारी करण्यात आलेल्या भारतीय लेखा मानक १०८ मध्ये दिलेल्या "ऑपरेटिंग सेग्मेंट" मध्ये विहित केल्याप्रमुसार अन्य अहवाल क्षेत्र विभाग नाही.

३. ३१.०३.२०२४ आणि ३१.०३.२०२३ रोजी संपलेले ३ महिन्यांचे आकडे पूर्ण वित्तिय वर्षाच्या संदर्भात लेखापरीक्षित आकडे आणि संबंधित वित्तिय वर्षाच्या १ महिन्यापर्यंत आकच्या दिरांकापर्यंत प्रसिद्ध झालेल्या वर्षांसाठी तुलनात्मक आकडे आहेत जे लेखा परीक्षकांच्याद्वारे मर्यादित समीक्षणाच्या अधीन असेत.

४. गत कालावधीचे आकडे आवश्यक तेथे चालू वर्षाच्या आकडुशांशी मेळ घालण्याच्याठी पुनर्गठित करण्यात आले आहेत.

ठिकाण: मुंबई
दिनांकित: ३० मे, २०२३

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड करीता
सही/-
(वालकृष्ण विनायी)
सीएफओ
डीआयएन: ००१७५०८०

पश्चिम रेल्वे

देखभाल काम

विभागिय रेलवे व्यवस्थापक (कलन्ट्रा), पश्चिम रेलवे, ६ वा मजला, अभि. विभाग, मुंबई सेंट्रल, मुंबई – ४०० ००८ ई-निविदा सूचना क्र.: बीबीटी/४४-२५/७४ दि. २८.०५.२०२४ मागविल आलेत. काम आणि ठिकाण : विरार – वडी. डहीरए/ उत्तर : रोशवसन रेलवे स्थायक अंच. (i). विरार यूव – टीआआर (पी) – २०.४३८ टिकिमी आणि टिशआआर (पी) – १९.०६५ टिकिमी (ii). वसई-भुरत-नोटीआर (एस/पी) – ४.३१३ टिकिमी आणि टीआआर (एस) – ६.६१५ टिकिमी चा संरमीत यी. डीईए/ उत्तर झाच्या अधिकारांवरचच्या अंतर्गत आरडीएसओ मान्यताप्राप्त संघषे रोधटिक वेल्डिंग मशीन वापरुन सर्व प्रकारच्या वॉर्ण झालेल्या सीएमएस (कास्ट मॅरेबनेट स्टील) क्लिंगचे इन-सिटू पुनप्रक्रिकरण. कामाचे अंदाजे मूल्य: क्र. १६,२२,६०२.०८– इरुं; क्र. १,९६,५००– शारदेकवणचा दिनांक आणि वेळ : १.३.०६.२०२४ रोजी १५.०० वा. पर्यंत उपरुणचाचा दिनांक आणि वेळ : २१.०६.२०२४ रोजी १५.३० वा. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या www.ireps.gov.in संकेतस्थळाला भेट द्या. 0191

अधिक माहिती साठी फक्त फॉलो करा facebook.com/WesternRly

बृहन्मुंबई महानगरपालिका

जाहीर सूचना

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की मे. तुषार इंझा डेवलपर्स प्रा. लि. आणि मे. पॅथेऑन बिल्डकॉन प्रा. लि. (पूर्वी पेरीसास मीडिया प्रा. लि. म्हणून ज्ञात असलेले) हे खालील परिशिष्टामध्ये अधिक विस्ताराने वर्णन करण्यात आलेली ज्यामुळे बृहन्मुंबईसाठी विकास नियंत्रण आणि प्रवर्तन नियमावली २०३४ च्या नियमावली ३२ च्या तरतूदीनुसार विकास अधिकार प्रमाणपत्राच्या स्वरूपात विकास अधिकारांच्या हस्तांतरण (टीडीआर) च्या संमती संदर्भात 'एल' प्रभागाच्या संमत विकास आराखडा २०३४ अनुसार १८.३० मी. रुंद संमत आर. एल. ते चांदिवली फार्म रोड द्वारे बाधित होणारी जमीन बृहन्मुंबई महानगरपालिका ह्यांना गाव साकीमधील निशुल्क आणि भारमुक्त जमिनीचा धारण केलेला सीटीएस क्र. १/ बी सुपूर्द करण्यास मान्यता दिली आहे.

कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्ती (ज्याचा अर्थ व्यक्ती, संस्था, कंपन्या, व्यक्ती, वैधानिक संस्था/संस्था किंवा इतर कोणतेही प्राधिकरण इत्यादींचा समावेश आहे.) ज्यांच्या विरुद्ध कोणतीही माहिती असेल आणि/किंवा कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, स्वारस्य असेल, मालकी, विक्री, देवाणघेवाण, हस्तांतरण, भाडेपट्टा, सबलीज, गहाण, भेटवस्तू, भाडेकरू, रजा आणि परवाना याप्रमाणे, या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या जमिनीच्या संदर्भात दावा, मागणी किंवा आक्षेप लिखित किंवा तिचा कोणताही भाग, ट्रस्ट, वारसा, मृत्युपत्र, ताबा, देखभाल, गृहीतक, शुल्क, धारणाधिकार, सुलभता, खटला, वाद, कोणत्याही स्वरूपाचे किंवा अन्यथा किंवा कोणत्याही स्वरूपाचे इतर कोणतेही हक्क किंवा हितसंबंध आणि अर्जदाराचा डीआर वरील दावा कोणत्याही प्रकारचा न मिळाल्यावर अवलंबून आहे भूसंपादन कायदा, किंवा इतर कोणत्याही कायद्यांतर्गत किंवा वरीलप्रमाणे परस्पर संमतीने भरपाई आणि कोणाकडे त्याच्या विरुद्ध माहिती असल्यास, याद्वारे विधी अधिकारी, विधी विभागाच्या कार्यालयात खाली स्वाक्षरीदारांना महानगरपालिका मुख्य कार्यालय (ॲनेक्स बिल्डिंग), ३ रा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई :- ४०० ००१, अशा कोणत्याही कथित दाव्यासाठी/आक्षेपासाठी कागदोपत्री पुराव्यासह/ पुराव्यासह किंवा न्यायालयाच्या आदेशासह प्रकाशित झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कळवावे असे आवाहन करण्यात येत असून, असे जर न झाल्यास दावा किंवा मागणी मानली जाईल. सर्व हेतू आणि उद्देशांसाठी माफ केले गेले आहे असे समजण्यात येईल.

वर नमूद केल्याप्रमाणे टीडीआर च्या स्वरूपामध्ये विकास अधिकारांच्या हस्तांतरणाच्या संदर्भात कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, बृमनपा अनुदान टीडीआरची प्रक्रिया कोणताही संदर्भ न देता किंवा अशा कोणत्याही कथित दाव्याचा किंवा व्याजाचा संदर्भ न घेता स्वतःच्या गुणवत्तेनुसार पूर्ण केल जे सर्व हेतू आणि हेतूंसाठी माफ केले गेले आहे असे मानले जाईल आणि ते बृमनपावर बंधनकारक असणार नाही.

उपरोक्त संदर्भात परिशिष्ट

(एसीएल/४७४१४/एई(एम)एल)

नोंदणीकरण जिल्हा आणि मुंबई शहर आणि मुंबई उपनगर उप जिल्ह्यामधील गाव साकी मधील ५८८.०६ चौ. मी. किंवा साधारणपणे तितक्याच मोजमाप असलेल्या जमिनीचा सी.टी.एस. क्र. १ बी चा सर्व खंड आणि भूखंड जो महानगरपालिका प्रभाग एल च्या संमत विकास आराखड्यामधील १८.३० मी. रुंद संमत आर. एल. ते चांदिवली रोड फार्मपुढे बाधित होणार आहे आणि त्याच्या सीमा पुढील प्रमाणे :

पूर्वेस किंवा त्या दिशेने : सध्याचा रोड
पश्चिमेस किंवा त्या दिशेने : सध्याचा रोड
दक्षिणेस किंवा त्या दिशेने : सध्याचा रोड
उत्तरेस किंवा त्या दिशेने : गाव साकीमधील सी.टी.एस. क्र. १ (भाग)

३० मे २०२४ रोजी दिनांकित

सही/-
श्री. सुनिल सोनवणे
वकील आणि विधी अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका साठी

पीआरओ/१३४/जाही/२०२४-२५

स्वमर्जीने औषधोपचार करू नका.